# महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणी आवश्यक : डॉ.सुरेश खाडे

**पुणे / प्रतिनिधी**

कामगारांना महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे केवळ १ रुपयांमध्ये नोंदणी करता येत असून या मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्याकरिता कामगारांनी नोंदणी करावी असे आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.

चिंचवड येथे रामकृष्ण मोरे नाट्यगृहात आयोजित नोंदीत घरेलू कामगारांना गृहउपयोगी वस्तुसंच वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार उमा खापरे, अमित गोरखे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंघल, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, अपर कामगार आयुक्त शैलेंद्र पोळ, उप आयुक्त अभय गिते, सदाशिव खाडे, घरेलू कामगार विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. खाडे म्हणाले, घरेलू कामगारांना या गृहोपयोगी वस्तूसंचाच्या माध्यमातून मायेची ऊब देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. घरेलू कामगारांना देण्यात येणाऱ्या लाभासाठी शासनाने ५० कोटी रुपयांची तरतूद केली असून मंडळामार्फत घरेलू कामगार महिलांना दोन अपत्यापर्यंत ५ हजार रुपये प्रसुती लाभ, सन्मानधन योजनेत वयाची ५५ वर्षे पूर्ण केलेल्या नोंदणीकृत पात्र घरेलू कामगारांना १० हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येतात. तसेच संसार उपयोगी भांडी, अंत्यविधीसाठी वारसास २ हजार रुपये सहाय्य देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

बांधकाम कामगारांनाही विविध लाभ देण्यात येतात. कामगारांची नोंदणी सुलभतेने होण्यासाठी नुकतेच तालुकास्तरावर ३०४ सेतू केंद्र सुरु करण्यात आले आहेत.



शासन सर्वसामान्यांच्या हिताच्या विविध योजना राबवित असून योजनांच्या माध्यमातून शासन आपल्या घरापर्यंत पोहोचले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची रक्कम दरमहा दीड हजारावरुन तीन हजार करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे सांगून शासन कामगारांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

श्रीमती सिंघल म्हणाल्या, घरेलू कामगारांना हक्काच घरं, मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था, महिलांच्या आरोग्याची काळजी तसेच घरेलू कामगारांना पेन्शनची सोय करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. घरेलू कामगार मंडळाकडे अधिकाधिक महिलांनी नोंदणी करावी व इतरांनाही नोंदणीसाठी प्रेरित करावे. त्यामुळे नोंदणीकृत कामगारांना लाभ देणे शक्य होईल. मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या लाभासाठी नोंदणीचे नुतनीकरण आवश्यक असल्याचे सांगून हे शासन लोकाभिमूख असून कामगारांना मदतीचा हात देत आहे असे त्या म्हणाल्या. कामगार मंत्री यांच्या हस्ते जिल्ह्यातील १ हजार ८२० घरेलू महिला कामगारांना गृहोपयोगी वस्तुसंचाचे वितरण करण्यात आले. यावेळी आमदार उमा खापरे व अमित गोरखे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात शैलेंद्र पोळ यांनी मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली.

## थोडक्यात

### पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**शिक्रापूर :** वाजेवाडी ता. शिरुर येथील शिक्रापूर चाकण रस्त्यावर दुचाकी चालकाला पिकअपची धडक बसून झालेल्या अपघातात सुरज पांडुरंग भाग्यवंत या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे किसन शाहूराव शिंदे या वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाजेवाडी ता. शिरुर येथील शिक्रापूर चाकण रस्त्याने सुरज भाग्यवंत हा युवक त्याच्या ताब्यातील एम एच २४ २९९२ या दुचाकीहून चाकण बाजूने शिक्रापूर कडे येत असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या एम एच १२ व्ही टी ६३१९ या पिकअपची सुरजच्या दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात सुरज गंभीर जखमी झाला, सदर अपघातात सुरज पांडुरंग भाग्यवंत वय २५ वर्षे रा. वाजेवाडी चौफुला ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पुईणी ता. पालम जि. परभणी याचा मृत्यू झाला, याबाबत गजानन पांडुरंग भाग्यवंत वय २५ वर्षे रा. वाजेवाडी चौफुला ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पुईणी ता. पालम जि. परभणी यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी किसन शाहूराव शिंदे रा. खडकी देवळा ता. वळवणी जि. बीड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास सरोदे हे करत आहे.

### पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर तरुणाचा मृतदेह

**देहूरोड :** देहूरोड पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या ट्राय जेसुस चर्चच्या पाठीमागील डोंगराच्या पायथ्याशी एका तरूणाचा मृतदेह आढळून आला. ही घटना शुक्रवारी (दि. २०) सकाळी उघडकीस आली. अजय जोगिंदर लुक्कड (वय २१) असे मृतदेह आढळून आलेल्या तरुणाचे नाव आहे. सहायक पोलीस आयुक्त देविदास घेवारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत देहूरोड - कात्रज बायपास रोडवर असलेल्या ट्राय जेसुस चर्चच्या पाठीमागील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या खदान मध्ये शुक्रवारी सकाळी एका तरूणाचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार देहूरोड पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता अजय लुक्कड हा तरुण मृतावस्थेत आढळून आला. अजय याचा खून केल्याची शक्यता लक्षात घेत देहूरोड पोलिसांनी तपास केला. काही वेळेत पोलिसांनी काही जणांना संशयावरून ताब्यात घेतले आहे.

## आदिवासी समाजातील नागरिकांनी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी



**पुणे :** जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, भोर, वेल्हा व हवेली तालुक्यातील आदिवासी समाजातील नागरिकांनी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाचा लाभ घ्यावा; आदिवासी सामाजिक संस्था, संघटना, आदिवासी स्वयंसेवकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत आदिवासी समुदाय, आदिवासी बहुल गावे आणि अकांक्षित जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांसाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान राबविण्यास मंजूरी देण्यात आली आहे. आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात येणार आहे. यामध्ये आदिवासी क्षेत्रातील प्रत्येक गाव व त्यातील प्रत्येक आदिवासी कुटुंबाच्या सर्वांगिण विकासाच्यादृष्टीने रस्ते, पक्की घरे, पाण्याची व्यवस्था, विद्युत पुरवठा, फिरते वैद्यकीय पथक, उज्ज्वला गॅस योजना, अंगणवाडी केंद्र बांधणे, पोषण स्थितीत सुधारणा, कौशल्य विकासविषयक प्रशिक्षण, कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ, मत्स्यव्यवसायास चालना, पर्यटन विकास, शासकीय निवासी शाळा व शासकीय वसतिगृहांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आदी प्रकारचे लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सदरचे लाभ देण्याकरीता एकूण १७ विभागाचा या अभियानात समावेश करण्यात आला आहे. यामुळे आदिवासी बहुल गावांचा सर्वांगीण विकास होण्याबरोबच समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होणार आहे, अशी माहिती घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी दिली आहे.

## अन्न व औषध प्रशासनामार्फत पुण्यात धडक

**पुणे / प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात अन्न व औषध प्रशासन पुणे कार्यालयामार्फत पुणे विभागामध्ये अन्न आस्थापनेच्या १०१ तपासण्या करण्यात आल्या असून या मधून दुध, खवा, पनीर, स्वीट मावा, तुप, चटर व नमकीन इत्यादी अन्न पदार्थाचे एकूण ११७ अन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. यामध्ये अन्न पदार्थाचा एकूण ९ लाख १९ हजार ५२० रुपयांचा किंमत्तीचा साठा जप्त करण्यात आला. पुणे जिल्हा व पुणे विभागात असे एकूण १४ लाख ३५ हजार ९५८ किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.

या मोहिमेत जिल्ह्यात अन्न आस्थापनेच्या ४८ तपासण्या करण्यात येऊन दुध, खवा, पनीर, स्वीट मावा, तुप, बटर व नमकीन इत्यादी अद्य पदार्थाचे एकूण ५३ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या विश्लेषण अहवाला मार्फत प्राप्त होताच कायद्याप्रमाणे कारवाई करून भेसळीच्या संशयावरुन विविध अन्न पदार्थाच्या धाडी घालुन जप्ती करण्यात आली. या कालावधीमध्ये पुणे कार्यालयाने गाईचे तूप, भेसळयुक्त बटर, स्वीट खवा व वनस्पती इत्यादी अन्न पदार्थाचा एकूण ५ लाख १६ हजार पेक्षा अधिक किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.

संबधीत कारवाई अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील सर्व सहायक आयुक्त या अन्न सुरक्षा अधिकारी यांचे मार्फत सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन राज्य पुणे तसेच आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली पार पडण्यात आली, सणासुदीच्या दरम्यान विक्री करण्यात येणा-या अन्न पदार्थामध्ये भेसळी संदर्भात काही संशय असल्यास नागरिकांनी प्रशासनाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधावा असे आवाहन श्री. सुरेश अनपुरे सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी केले आहे.

## पिंपळवंडी दुचाकीवर चाललेल्या तरुणावर बिबट्याचा हल्ला

**निरगुडसर :** कळंब ता. आंबेगाव गावच्या हद्दीत कळंब - लौकी रस्त्यावर कळंब येथे मामाकडे येत असलेल्या गणेश विलास ढवळे वय २४ रा. पिंपळवंडी ता. जुन्नर या तरुणावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना दि. १९ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हल्ल्यात तरुण जखमी झाला असून त्याच्यावर मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत.

दुचाकीवर कळंब येथे सिताराम किसन थोरात (मामाकडे) कामानिमित्त येत असताना तो कळंब गावच्या हद्दीत आला असता रस्त्याच्या बाजूला उसाच्या शेतात लपून बसलेल्या बिबट्याने अचानक त्याच्यावर झेप घेतली. त्यावेळी त्याच्या पायाला पाठीला बिबट्याचा पंजा लागल्याने जखम झाली होती. मामा व त्याच्या कुटुंबीयांनी त्याला तात्काळ मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी योग्य उपचार करत गणेश ढवळे या तरुणाची प्रकृती व्यवस्थित असल्याचे सांगितले. दरम्यान कळंब लौकी या रस्त्यावर गेल्या वर्षभरात बिबट हल्ल्याच्या नऊ ते दहा घटना घडल्या असून या ठिकाणी वारंवार पिंजरा लावूनही बिबट्या जेरबंद होत नसल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. ज्या ठिकाणी बिबट्याचा हल्ला होतो त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला लाईट नसल्याने त्या ठिकाणी लाईटची व्यवस्था करावी, तसेच रस्त्याच्या बाजूला असलेली झाडे झुडपे काढून टाकावी अशी मागणी स्थानिक शेतकरी विनोद थोरात यांनी केली आहे. कळंब लौकी रस्त्यावर यापूर्वीही बिबट्याने अनेकांवर हल्ला केला असून हल्ला करणारी बिबट मादी असण्याची शक्यता असून रस्ता ओलांडण्याच्या प्रयत्नात असताना हल्ला करत असावी असा अंदाज आहे. नागरिकांनी घाबरू नये मात्र सतर्कता बाळगावी रात्रीचे वेळी बाहेर पडताना काळजी घ्यावी, आजूबाजूला लक्ष ठेवावे यापूर्वी त्या ठिकाणी पिंजरा लावण्यात आला असून बिबट्या जेरबंद झाला नाही मात्र कालची घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी तात्काळ पिंजरा लावण्यात येईल तसेच तालुक्यात ज्या ठिकाणी बिबट्यांचे वास्तव्य आहे त्या ठिकाणी ग्रामपंचायत प्रशासनाने लाईटची व्यवस्था करावी तसेच ज्या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला झाडे झुडपे वाढले आहेत ती काढून टाकावी याबाबत तालुक्यातील ग्रामपंचायतींशी पत्र व्यवहार केला असल्याचे वन परिमंडल अधिकारी संभाजी गायकवाड यांनी सांगितले.

**इंदापूर नगरपरिषद, इंदापूर**

**निविदा सुचना सन २०२४-२५**

**जा.क्र.१५७४/२०२४-२५** **दि.२०/०९/२०२४**

आरोग्य विभागाकडील विविध कामांसाठी निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा सविस्तर तपशिल, अटी व शर्ती फॉर्म मध्ये दिले आहेत. निविदा फॉर्म इंदापूर नगरपरिषदेमध्ये दिनांक २१/०९/२०२४ पासून २६/०९/२०२४ पर्यंत कायालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**इंदापूर नगरपरिषद, इंदापूर**

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 20.09.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. शिवाजी गजानन शिंदे 2. गजानन महादेव शिंदे | अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : फ्लॅट क्र. डी-602, अधिमापन 43.76 चौ.मी. (सुमारे 471 चौ.फू.) चटई क्षेत्रफळ आणि बाजूची गच्ची जिचे अधिमापन 3.44 चौ.मी. (सुमारे 37 चौ.फू.) चटई क्षेत्रफळ अशा प्रकारे एकूण चटई क्षेत्रफळाचे अधिमापन 47.19 चौ.मी. (सुमारे 508 चौ.फू.) ज्यामध्ये 6व्या मजल्यावरील गच्ची समाविष्ट, सोबत बेसमेंटमधील आच्छादित कार पार्किंग क्र. 96 अधिमापन 8.36 चौ.मी. (90 चौ.फू.), सर्व काही डी-विंग, प्रकल्पाचे नाव ''डीएसके विद्यानगरी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'' मध्ये, स.क्र. 47 असलेल्या मालमत्तेवर बांधलेला, गाव बाणेर येथे स्थित, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे, नोंदणी जिल्हा पुणे, उपनिबंधक हवेली कार्यालयांच्या हद्दीमध्ये, आणि तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सोबत सामाईक क्षेत्र आणि सुविधा, फिक्स्चर्स, फिटिंग्ज, एमएसईडीसीएल मीटर, वापरण्याचे अधिकार आणि त्याचे साह्यभूत, आनुषंगिक आणि प्रसंगोत्पात अधिकार. | H16622250621125458 & H16622250621125458L | 11/09/2024 | रु. 4,02,136/- | रु. 59,90,956.56/- | रु. 40,21,360/- | सर्व कामकाजांच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत पूर्वनियोजित भेटीसह. | 25.10.2024 दुपारी 12.00 ते दुपारी 2.00 |

**सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/10/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **25/10/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **26/10/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - श्री शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स लिमिटेड, 3रा मजला, कार्यालय क्रमांक 301 आणि 302, जेनिथ कॉम्प्लेक्स, के बी जोशी पथ, शिवाजी नगर, पुणे 411005 आणि श्री संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व - 0 मुंबई), 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 21.09.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**ग्रामपंचायत सोळू ता.खेड, जि.पुणे.**

**बी-१ खुली निविदा सूचना क्र.१ सन २०२४-२५**

ग्रामपंचायत सोळू ता.खेड, जि.पुणे यांचेतर्फे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार तसेच खालील कामांशी संबंधित ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांची मोहोरबंद निविदा २ पाकिटे पद्धतीने मागविणेत येत आहे. को-या निविदांचा नमुना ग्रा.पं.कार्यालय सोळू ता.खेड यांच्याकडुन दि.२०/०९/२०२४ ते दि.२७/०९/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सकाळी १०:०० ते सायं०४:३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.२०/०९/२०२४ ते दि.२७/०९/२०२४ रोजी (सकाळी १०:०० ते सायं.०४:३० वाजेपर्यंत) ग्रा.पं.कार्यालय सोळू येथे स्विकारल्या जातील व प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वाजता किंवा येणाऱ्या लगतच्या मासिक सभे दिवशी ग्रामपंचायत सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रू. | निविदेची फि. र.रू | इसारा र.रू. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे सोळू या ठिकाणी स्मशानभुमी वाढीव रस्ता काँक्रिट करणे.(ग्रामनिधी) | १,६०,६६६/- | २००/- | १६०६/- | ३ महिने |
| २. | मौजे सोळू (ठाकुरवस्ती) येथे ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. (ग्रामनिधी) | २,५८,९४६/- | २००/- | २५८९/- | ३ महिने |
| ३. | मौजे सोळू येथील अंगणवाडी देखभाल दुरुस्ती, साहित्य खरेदी करणे. (२०२३-२४ १५ वा वित्त आयोग) | ८६,२७९/- | २००/- | ८६२/- | ३ महिने |
| ४. | मौजे सोळू येथील ठाकूरवस्ती/शाळा अंगणवाडी दुरुस्ती व संरक्षक भिंत शाळा दुरुस्ती करणे. (२०२३-२४ ग्रामनिधी+१५ वा वित्त आयोग) | ८७,८५४/- १,४२,५९२/- | २००/- | २३०४/- | ३ महिने |
| ५. | मौजे सोळू येथील वाडी वस्ती रोड दुरुस्ती करणे.(ग्रामनिधी २०२३-२४) | १,२४,७८१/- | २००/- | १२४७/- | ३ महिने |
| ६. | मौजे सोळू येथील नळ पाणीपुरवठा दुरुस्ती करणे. (१५ वा वित्त आयोग २०२३-२४) | ८४,४९०/- | २००/- | ८४४/- | ३ महिने |
| ७. | मौजे सोळू येथील नळ पाणीपुरवठा दुरुस्ती करणे. ( ग्रामनिधी २०२३-२४) | ४७,३२९/- | २००/- | ४७३/- | २ महिने |
| ८. | मौजे सोळू येथील स्मशानभूमी शेड काढणे. (ग्रामनिधी) | ४०,०००/- | २००/- | ४००/- | २ महिने |
| ९. | मौजे सोळू येथील स्मशानभूमी स्क्रॅप मटेरियल विकणे बाबत. | दर:-बाजार भावने चालू दर | | | |

**टिप:-१.**कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे.**२.** सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपूर्ण तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला आहे.**३.**सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे :-१.नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३.आयकर प्रत ४.पॅनकार्ड.

**सही/-**
**ग्रामसेवक/सरपंच,**
**ग्रामपंचायत सोळू ता.खेड जि.पुणे.**

**ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. हवेली, जि. पुणे**

**खुली निविदा सूचना**

**बी-१ सूचना क्र. २ सन २०२४-२५**

सरपंच, ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. हवेली, जि.पुणे यांचे वतीने तर्फे जि. प. पुणे/महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. हवेली जि . पुणे यांच्याकडून दि. २१/०९/२०२४ ते २७/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. २१/०९/२०२४ ते २७/०९/२०२४ पर्यंत दु. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. हवेली येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि. २८/०९/२०२४ रोजी दु. ०४.०० वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | बयाना रक्कम रु. | निविदा रक्कम फी रु. | ठेकेदार वर्गीकरण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे डोंगरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मागे भूमिगत गटर करणे, ता. हवेली (१५ वा वित्त आयोग) | ४,६७,५४८/- | सूट | २३६/- | सु.बे अभियंता | ३ महिने |
| २. | मौजे डोंगरगाव येथील सिद्धार्थ नगर येथे भूमिगत गटर करणे, ता. हवेली (दलितवस्ती 'सुधार' ' योजना २०२३- २४) | ४,२३,१३७/- | १% | २३६/- | सर्वसाधारण खुला वर्ग | ३ महिने |
| ३. | मौजे डोंगरगाव येथील म्हस्केवस्ती येथे भूमिगत गटर करणे, ता. हवेली ( १५ वा वित्त आयोग) | ८३,४७८/- | सूट | २३६/- | मजूर.स संस्था | ३ महिने |

**१.** कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत डोंगरगाव, ता. हवेली येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे १. निविदा फी पावती, २. नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४ . वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

**सही/-** **ग्रामसेवक** **ग्रामपंचायत डोंगरगाव ता. हवेली, जि. पुणे**

**सही/-** **सरपंच** **ग्रामपंचायत डोंगरगाव ता. हवेली, जि. पुणे**

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com